MHRG040052862025

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६४८/२०२५</u>**

श्रीमती. नसिम उनिस्सा मोहम्मद उमर कच्छी व इतर वि. निरंक

**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

१. सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन १८२७ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे मयत राबीया ईस्माइल कच्छी या दिनांक १९.०३.२०२४ रोजी पनवेल येथे मृत्युपत्र न करता मरण पावले आहेत. अर्जदार क्रं. १ व २ या मयत राबीया ईस्माइल कच्छी यांच्या मुली आहेत. अर्जदार हे मयत राबीया ईस्माइल कच्छी यांचे वारस आहेत. मयत राबीया ईस्माइल कच्छी यांचे पती इस्माईल हुसेन कच्छी हे दिनांक ०३.०६.१९७८ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार यांनी वारसदाखला मिळण्याकामी या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही. करीता सदर अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र १ यांनी नि.क्र. ९ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. तसेच कागदपत्र म्हणुन मयत राबीया ईस्माइल कच्छी यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१२, मयत ईस्माइल हुसेन कच्छी यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१३, मिळकतींची मालमत्ता पत्रकांची सर्टीफाईड प्रती नि.क्र.१४, अर्जदारांचे आधारकार्डची प्रमाणित प्रत नि.क्र. १५ व १६, अर्जदार यांचे रेशनकार्डची प्रमाणित प्रत नि.क्र.१७, पुरावा बंद पुरशीस नि.क्र. १९ वर दाखल केले आहे.

४. अर्जासंदर्भात नि.क्र. ७ प्रमाणे जाहीरनामा व नि.क्र. १८ वरील 'दैनिक किल्ले रायगड' वर्तमानपत्रातील दिनांक २६.१२.२०२५ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मात्र कोणत्याही ति—हाईत इसमाची याकामी हरकत प्राप्त झाली नाही.

५. दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता मयत राबीया ईस्माइल कच्छी या दिनांक १९.०३.२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ व २ हया मयत राबीया ईस्माइल कच्छी यांच्या मुली आहेत. करिता अर्जदार हे मयत राबीया ईस्माइल कच्छी यांचे कायदेशीर वारस आहेत. नि.क्र. ७ वरील जाहीरनामा व नि.क्र.१८ वरील जाहीर नोटीस प्रसिध्द होउन देखील इतर कोणत्याही ति—हाईत इसमांनी याकामी हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे **मयत राबीया ईस्माइल कच्छी** यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला आवश्यक त्या मुद्रांकशुल्क यावर देणेत यावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR

Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.03.13 12:57:11 +0530

पनवेल (राजश्री म. गणवीर)

**दि.१२.०३.२०२६** **३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल**